0068622

FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. 41, वर्ष Year 2023 दिनांक Date 18/12/2023
2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रति. अधि. 1988, कलमे Sections 7 प्रमाणे
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day रविवार, तारीख पासून Date from 03/12/23 वेळ Time 13:14 वा तारीख पर्यंत Date to 18/12/23, वेळ Time 18:55 वा
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 04/12/2023, वेळ Time 11:00 वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 37/23, तारीख Date 18/12/23 वेळ Time 18:55 वा.
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी तक्रार अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ........
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name एम.एच.बी. पोलीस ठाणे, बोरीवली, मुंबई, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name नूर मोहम्मद कबीर अहमद खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name कबीर अहमद खान
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 38 वर्षे. (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8070558880
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation फलकार व कन्स्ट्रक्शन
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : ........, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........ घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/M. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road प्लॉट नं. 28/515, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place शिवाजी नगर, गाव Village गोवंडी, पोस्ट Post मुंबई 43, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........ राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address वरीलप्रमाणे
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   श्री. सूर्यकांत पवार, सहा. पोलीस निरीक्षक, एम.एच.बी. पोलीस स्टेशन, बोरीवली, मुंबई.

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी श्री. नूर मोहम्मद कबीर अहमद खान, वय 38 वर्षे, धंदा:- पत्रकार व कंन्स्ट्रक्शन, रा. ठि. प्लॉट नं. 28/ई/5, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई 43 यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर संगणकावर टंकलिखित करण्यात आला असून तोच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(गणपत पस्पाके)
पोलिस निरीक्षक
का.प्र.वि. मुंबई.

नूर मुहम्मद खा.

जबाब दि. १८/१२/२०२३

मी नूर मोहम्मद कबीर अहमद खान, वय ३८ वर्षे, व्यवसाय – पत्रकार तथा कंन्ट्रक्शन रा.ठि.– प्लॉट नं. २८/ई/५,शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई ४३. मो.नं. ८०७०५५८८८०, आधार कार्ड क्रमांक – ३३०२९१३४३८५१.

———•———

मी वर दिलेल्या पत्त्यावर माझ्या कुटुंबासह जन्मापासून राहत असून मी प्रहारी मुंबई न्युज या साप्ताहीक न्युज पेपरचा संपादक/पत्रकार आहे. तसेच मी मुंबई परिसरात कंन्ट्रक्शनचा व्यवसाय करत असून त्यातुन माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवतो.

माझ्या मित्र मंडळीच्या ग्रुप मधील एक मित्र जो काशिमिरा रोड ठाणे येथे राहतो त्यांचे नाव शौकत पठाण आहे.तो यापूर्वी काशिमिरा रोड परिसरात पानमसाला विक्रीचे काम करायचा. सध्या तो बेकार आहे. दि. ०३/१२/२०२३ रोजी व्हॉटसअप नंबर ९८२१६३२३३८ वरून माझ्या व्हॉटसअप नंबर ८०७०५५८८८० वर दुपारी एक ते सव्वाएक च्या सुमारास कॉल आला तेव्हा समोरून एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथून ए.पी. आय. सुर्यकांत पवार असे बोलत असल्याचे सांगून त्यांनी माझा मित्र शौकत पठाण याच्या सांगण्यावरून मला कॉल केला व सांगितले की, शौकत यास दोन दिवसापूर्वी एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथील गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तेव्हा ए.पी.आय. सुर्यकांत पवार यांनी मला सांगितले की, शौकत पठाण याला दुसऱ्या गुन्हयामध्ये ताबा घेउन अटक न करण्याकरिता रू.३,००,०००/– (तीन लाख रूपये) द्यावे लागतील असे सांगून मला एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथे रक्कम घेवून येण्यास सांगितले होते. परंतु त्याच दिवशी माझ्या मामाचे निधन झाले असल्याने मी ए.पी.आय. पवार यांना एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथे भेटायला गेलो नाही. परंतु ए.पी.आय. सुर्यकांत पवार हे त्यांच्या व्हॉटसअप नंबर ९८२१६३२३३८ वरून माझ्या व्हॉटसअप नंबर ८०७०५५८८८० वर वारंवार कॉल करून मला रू.३,००,०००/– (तीन लाख रूपये) घेवून येण्यास सांगत होते.

सदर ए.पी.आय. सुर्यकांत पवार यांना लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. ०४/१२/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा. समक्ष हजर राहून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक गणपत परचाके यांनी एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथील वरील ए.पी.आय. सुर्यकांत पवार हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत मी हिंदीमध्ये टंकलिखीत करून आणलेला माझे सहीचा दि. ०४/१२/२०२३ रोजीचा तक्रार अर्ज दिला.

सदर वेळी पो.नि. अजित झांजुर्णे व दोन पंच ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात हजर होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक परचाके यांनी दोन शासकीय पंचांशी व पो.नि. अजित झांजुर्णे यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक परचाके यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून मी हिंदीमध्ये टंकलिखीत करून आणलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोलीस निरीक्षक परचाके यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोलीस निरीक्षक परचाके यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात ठेवला. तसेच ए.पी.आय. पवार यांची रात्रपाळी डयुटी असल्याबाबत मी पो.नि. परचाके यांना सांगितले. त्यामुळे पो.नि. परचाके यांनी पंचांना व मला स्वागत कक्ष येथे बसण्यास सांगितले.

त्यानंतर पो.नि. परचाके यांनी पंचांना आणि मला रात्रौ २२:०० वा. त्यांच्या कक्षात बोलाविले. एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथील वर नमुद ए.पी.आय. सुर्यकांत पवार यांनी मला दि.०३/१२/२०२३ रोजी त्यांनी मागणी केलेली रक्कम रु. ३,००,०००/– घेवुन एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथे बोलाविले असल्याचे मी ला.प्र.वि कार्यालयातील पोलीस निरीक्षक परचाके यांना सांगितले असल्याने त्यांनी माझे तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर ए.पी.आय. पवार यांचे भेटीचे ठिकाण व वेळ निश्चित



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी नूर मोहम्मद कबीर अहमद खान यांचा दि. १८/१२/२०२३ रोजीचा जबाब पुढे चालू .......

करण्याकरिता मला माझ्या मोबाईल फोन क. ८०७०५५८८८० वरून ए.पी.आय. पवार यांच्या मोबाईल फोन क. ९८२१६३२३३८ संपर्क केला परंतु ए.पी.आय. पवार यांनी कॉल उचलला नाही. थोडयावेळाने पुन्हा माझ्या मोबाईल फोन क. ८०७०५५८८८० वरून ए.पी.आय. पवार यांच्या मोबाईल फोन क.९८२१६३२३३८ वर व्हॉटअप कॉलद्वारे संपर्क केला असता, संभाषणात मी ' **आरे साब फोन किया दोपहर में भी... आप उठाया नही... फिर अभीबी किया आपको फोन... दोपहर को आधे रास्ते तक आ गया था... फिर फोन किया मालूम पडा आप घरपें चले गये...** असे ए.पी.आय. पवार यांना सांगितले असता, ए.पी.आय. पवार यांनी '**ए भाय तेरे को आना है तो आ... नही तो मत आ... मै किधर तेरे को बार बार तेरे को बोलने नहीवाला है समजेक्या... अभी क्या है बोल अभी किधर है, मै हू नाईट में... आ रहा है क्या अभी**...असे मला सांगितले त्यावर मी ' **ठिक है आ रहा हू साब. .. आ रहा हू... आ रहा हू अभी..**' असे ए.पी.आय. पवार यांना सांगितले. त्यानंतर पो.नि. परचाके यांनी पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असुन होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले. तसेच ए.पी.आय. पवार यांना संशय येवून नये म्हणून पडताळणीकरिता पो.नि. परचाके यांनी खाजगी वाहन वापरावे अगर कसे याबाबत पो.नि. झांजुर्णे यांच्याशी चर्चा केली. त्यावर पडताळणी करिता गोरेगाव नेस्को येथे माझ्या मित्राची मोटार कार क. एमएच–०३–इएफ–१५०४ ही मागवुन ए.पी.आय. पवार यांना भेटावयास जावू असे पो.नि. परचाके यांना सांगितले असता त्यावर पो.नि. परचाके आणि पो.नि. झांजुर्णे यांनी मान्यता दिली.

पोलीस निरीक्षक परचाके यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवुन ला.प्र.वि.कार्यालयातून मी, शासकिय पंच, पो.नि. झांजुर्णे, पो.नि. परचाके व स्टाफ सह दोन शासकीय वाहनातून निघालो. त्यानंतर पोलीस पथकासह निघुन वरळी सि लिंक मार्गे, पश्चिम द्रुतगती मार्गे, गोरेगाव नेस्को येथे आल्यानंतर उर्वरित सापळा पथक असलेले दुसरे वाहन थांबविण्यात आले तसेच माझ्या मित्राचे मोटार कार क. एमएच–०३–इएफ–१५०४ हे सोबत घेण्यात आली. नमुद दोन्ही वाहने पश्चिम द्रुतगती मार्गे कोरा केंद्र रोड, बोरीवली पश्चिम येथील वृंदावन गार्डन जवळ येथे पोहोचल्यानंतर पो.नि. परचाके यांचे सुचनेवरुन दोन्ही वाहन थांबविण्यात आले.

त्यानंतर मला पोलीस निरीक्षक परचाके यांनी एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथील ए.पी.आय. पवार यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच सोमनकर यांचे सह मोटार कार क. एमएच–०३–इएफ–१५०४ मध्ये दि. ०५/१२/२०२३ चे ००:३० वा. बसून पाठविले. सदरचे वाहन हे एम एच बी पोलीस स्टेशन च्या बाहेर रस्त्यालगत पार्क करून आम्ही दोघे एम एच बी पोलीस स्टेशन येथे चालत पोलीस स्टेशनच्या पहिल्या मजल्यावरील गुंडा विरोधी पथक असे लिहिलेल्या रूमच्या समोरील रूममध्ये गेलो. तिथे लोकसेवक पवार एका इसमाशी बोलत होते. त्यावेळी आम्ही दोघेजण बाहेरच थांबलो. थोडयावेळाने ए.पी.आय. पवार हे रूमच्या बाहेर आले. ए.पी.आय. पवार व मी बोलत बाजूच्या रूम मध्ये जावून थांबलो. पंच सोमनकर हे बाहेर थांबून राहिले. **मी ए.पी.आय. पवार यांना 'मै लेकीन कल ही आताथा साब... लेकीन पता है ना ए सब ए चिज हो गया क्या बोलू आपको मै...' असे बोललो असता ए.पी.आय. पवार यांनी ' तेरे हिसाबसे नही चलताना हम लोग... नही मेरे को ताबा नही लेने का तो वही चलाना मेरा काम.... मैने मेरा कमिंटमेंन्ट बोलाथा, वो कराकी नही... उनका ताबा फिरसे देगा.. वो आपन ही ले सकता है ना ... हा तो भी ठिक है ना, छे तारीख है ना उसमें क्या... अभी भी छे को ही होगा... अभी तो भेजू कल उसको... तेरे को दो कपडा बोला था उसका... दो कपडे मे उसका हो जाएगा...सुनोना मतलब क्या... बात होगयला है पहिलेही... अभी तुम आके .... तुमको भी मैने बोला उतना ही होगा, ठिक है नही तो छोड दो... ' असे मला बोलले. त्यावर मी ए. पी.आय. पवार यांना सर दो लाख जादा, थोडा तो कुछ कम करो..असे सांगितले असता ए.पी.आय. पवार यांनी**



Scanned with OKEN Scanner

'बोलाना मैने उसको पहिले.... पहिले ही ताबा न लेने से पहिले बोला था ना ...मै पैसेका सामने... सामने बात किया...वो कैसे करे मॅनेज .. मेरा बात हो गयाना तुम उससे ही बात करो.... ठिक है तो फिर बात में जमता है तो ठिक है नही तो छोड दोना... कल का क्यू रखरेले.... नाईट भी है मेरा...असे मला सांगितले. त्यावर मी ए.पी. आय. पवार यांना नाईट में है ना आप... एक देड घंटे में... मै कराता हू.. असे सांगितले असता ए.पी.आय. पवार यांनी 'करो तुम तुमारे हिसाब से.. ठिक है...' असे सांगितले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथून निघुन पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत निघुन आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक परचाके यांनी माझे बनियनला लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केले व माझेसोबत असलेल्या शासकीय पंचाकडे घडलेल्या हकीकतीबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मी वर सांगितल्याप्रमाणे मिळती–जुळती हकीकत सांगितली.

पडताळणी अंती ए.पी.आय. पवार कडून लाच मागणी केल्याबाबत डिजीटल रेकॉर्डर मध्ये झालेले संभाषण ऐकुन खात्री झाल्यानंतर तात्काळ सापळा कारवाई करावयाचे ठरले. सदरवेळी ए.पी.आय. पवार यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेची पुर्तता करणेबाबत पोलीस निरीक्षक परचाके यांनी विचारणा केली असता मी त्यांना माझेकडील रक्कम आणि माझ्या मित्रांकडून जमा केलेली रक्कम खिशामध्ये एकूण रु. १,५०,०००/– (दीड लाख रूपये) असल्याचे सांगितले.

तदनंतर पोलीस निरीक्षक झांजुर्णे यांनी माझेकडे असलेली रक्कम रु.१,५०,०००/– रक्कमेच्या रु. ५००/– दराच्या भारतीय चलनातील ३०० नोटांचे मोबाईल फोनमध्ये फोटो काढले. त्यानंतर तातडीने गोरेगाव नेस्को येथे थांबण्यास सांगण्यात आलेल्या पथकास आम्ही थांबलेल्या ठिकाणी पोहोचण्याबाबत सांगितल्यानंतर काही वेळातच दुसरे पथक आम्ही थांबलेल्या ठिकाणी हजर झाले. त्यानंतर दोन पंचासमक्ष चालक पो.ह. भोसले यांच्याकडून रू. ५००/– दराच्या १०० भारतीय चलनी नोटांचे तीन बंडल करून त्यांना कापसाच्या बोळ्याने अॅन्थ्रासिन पावडर लावली. त्यानंतर सदरच्या नोटांचे तीन बंडल हया एका काळया रंगाच्या प्लास्टीक पिशवी मध्ये ठेवल्या व सदर काळया रंगाच्या प्लास्टीक पिशवीला बाहेरून कापसाच्या बोळयाने हलक्या हाताने अॅन्थ्रासिन पावडर लावली. तदनंतर सदर पावडर लावलेल्या काळया रंगाच्या प्लास्टीक पिशवीला माझे पॅन्टच्या उजव्या खिशामध्ये ठेवण्यात आली. त्यानंतर माझ्या मोबाईल फोन क. ८०७०५५८८८० वरून ए.पी.आय. पवार यांच्या मोबाईल फोन क.९८२१६३२३३८ वर व्हॉटअप कॉलद्वारे संपर्क केला असता, संभाषणात मी **'हा साब मै पंधरा–बिस मिनिटमें पोंहच रहा हू...'** असे ए.पी.आय. पवार यांना सांगितले असता, ए.पी.आय. पवार यांनी **'किधर है अभी'** असे विचारले. त्यावर मी **'मै अभी रास्तेमे... पंधर बिस मिनिटमें आ जाउंगा... आप उधरही मिलेंगेना....'**असे ए.पी.आय. पवार यांना सांगितले त्यावर ए.पी.आय. पवार यांनी **' हा...'** असे मला सांगितले.

त्यानंतर पो.नि. परचाके यांनी सापळा पथकास दिसेल अशा रितीने दोन्ही हाताने शर्टची किनार झटकुन लाच स्विकारल्याबाबत इशारा करावा, असे मला सांगितले. तदनंतर पुन्हा माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल रेकॉर्डर चालू करून लावण्यात आले. मी व शासकीय पंच सोमनकर सह ए.पी.आय. पवार यांचे एम.एच.बी. पोलीस स्टेशनच्या दिशेने मोटार कार क्र. एमएच–०३–इएफ–१५०४ मध्ये बसून पाठविले. आमचे पाठोपाठ काही अंतर राखून पथकातील अधिकारी व अंमलदार त्याचप्रमाणे पंच म्हात्रे देखील होते. सदरचे वाहन हे एम एच बी पोलीस स्टेशन च्या बाहेर रस्त्यालगत पार्क करून आम्ही दोघे एम एच बी पोलीस स्टेशन येथे चालत पोलीस स्टेशनच्या पहिल्या मजल्यावर गेलो असता तिथे हजर असलेल्या पोलीस अंमलदार यांना एपीआय पवार यांना भेटायचे असल्याचे मी सांगितले. त्यावर त्या पोलीस अंमलदार यांनी एपीआय पवार हे बाहेर गेले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी माझ्या मोबाईल फोन वरून ए.पी.आय. पवार यांना मोबाईलवर संपर्क केला. त्यावेळी मी **'हा साब किधर हो....असे बोललो असता, ए.पी.आय. पवार यांनी 'बाहर हूँ.. आता हूँ ' असे मला सांगितले त्यावर**



Scanned with OKEN Scanner

फिर्यादी नूर मोहम्मद कबीर अहमद खान यांचा दि. १८/१२/२०२३ रोजीचा जबाब पुढे चालू ........

मी 'कितना देर में... ' असे विचारले असता ए.पी.आय. पवार यांनी मला ' इधर डॉन बॉस्को मे चोरी हो गयी समय लगेगा ' असे मला सांगितले वरून मी त्यांना 'रूकू मै सर...' असे विचारले असता ए.पी.आय. पवार यांनी 'हा' असे बोलले. त्यानंतर ए.पी.आय.पवार येत नसल्याने काही वेळाने मी पुन्हा ए.पी.आय. पवार यांना फोन लावला असता, मी ए.पी.आय. पवार यांना 'हा साब... बाहरही खडा हू....' असे बोललो असता ए.पी.आय. पवार यांनी ' सुबह आ जा.असे बोलल्याने मी ए.पी.आय. पवार यांना 'चलेगा...चलेगा... चलो ठिक है सुबह आता हू फिर... 'असे म्हणालो. तसेच घाई गडबडीत मी सदरचा कॉल करते वेळी फोन स्पीकरवर ठेवला नव्हता. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथून निघुन पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी पहाटे ०५:०० वा. चे सुमारास परत निघुन आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक परचाके यांनी माझे बनियनला लावण्यात आलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद करून त्यांच्या ताब्यात घेतले. व माझे सोबत असलेल्या शासकीय पंचाकडे घडलेल्या हकीकतीबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मी वर सांगितल्याप्रमाणे मिळती-जुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही सर्वजण ला.प्र.वि. कार्यालयात आलो. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकून सदर संभाषणाचे ट्रान्सस्क्रिप्ट तयार केले. त्यानंतर ए.पी.आय. पवार यांनी सकाळी बोलविल्याने सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. ए.पी.आय. पवार यांनी लाचेच्या संदर्भाने मोबाईल फोन वर संपर्क केल्यावर तात्काळ पो.नि. परचाके यांना संपर्क साधण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर लाचेची रक्कम रू. १,५०,०००/- ही पंचांसमक्ष मला परत करण्यात आली. त्यानंतर ए.पी.आय. पवार यांनी मला कुठल्याही प्रकारचा संपर्क किंवा निरोप दिला नाही. दि. ०६/१२/२०२३ रोजी माझा मित्र शौकत पठाण यास दुसऱ्या गुन्हयात अटक न करता त्यास ज्युडीशियल कस्टडीत ठाणे कारागृहात दाखल केले आहे. यावरून ए.पी.आय. सुर्यकांत पवार हे माझ्याशी परत संपर्क करण्याची शक्यता वाटत नाही.

तरी ए.पी.आय. सुर्यकांत पवार, एम.एच.बी. पोलीस स्टेशन, बोरीवली, मुंबई यांनी एम.एच.बी. पोलीस स्टेशन बोरीवली येथील त्यांच्याकडील गुन्हयात अटक असलेला माझा मित्र शौकत पठाण याचा दुसऱ्या गुन्हयामध्ये ताबा घेउन अटक न करण्याकरिता रू.३,००,०००/- (तीन लाख रूपये) लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रु. २,००,०००/-(दोन लाख रूपये) रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणी कारवाई मध्ये स्पष्ट झाले आहे, म्हणून माझी त्याचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेबाबत तक्रार आहे. माझे ए.पी.आय. सुर्यकांत पवार यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद माझ्या सांगण्याप्रमाणे मराठीमध्ये लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून त्याची प्रिंटरद्वारे प्रिंट काढुन ती मला वाचून दाखविली व हिंदीतून समजावुन सांगितली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( गणपत परचाके ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई



Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... फिर्यादीकडुन

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

बाजूस नमूद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांच्या मित्रा नामे श्रीकांत पठाण, रा. दि. काशिमीरा रोड, ठाणे यास गुन्हा क्र. [illegible] पोलीस ठाणे बोरिवली, मुंबई येथे एका गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी सपोनि सूर्यकांत पवार यांनी फिर्यादी यांना फोन करुन त्यांच्या अटक आरोपी मित्रास दुसऱ्या गुन्ह्यात अटक न करण्यासाठी तीन लाख मध्ये लाचेची मागणी केली. पडताळणीदरम्यान तडजोडीअंती सपोनि पवार यांनी त्यामध्ये दोन लाख लाच स्विकारण्याचे मान्य करुन गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून सपोनि सूर्यकांत पवार यांचेविरुद्ध कलम 7 अन्वये भ्र. प्रति. अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. गणपत पस्पाके, लाप्रवि, मुंबई विभाग.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)...... Rank...... No...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to...... (3) Transferred to P. S. ...... District...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा [signature]

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... गणपत पस्पाके

पदनाम Rank...... पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ......

Posting

Code No. of I. O. ला.प्र.वि. मुंबई विभाग.

15. 1. न्यायालयांस सादर केल्याची तारीख... 19/12/2023

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner